(२१)

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

BR 046478

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

अनु.क्र. २०६०० दि. १०।८।२०२२ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव शिरीष बबन मोटे

पत्ता खराडी पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता रामचंद्र पासलकर, शिवाजीनगर पुणे

शुभांगी सुहास बनकर
परवाना क्र. २२०१११७
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही १३४४ शिवाजीनगर पुणे म.न.पा. समोर पुणे

05 AUG 2022

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

NOTARY GOVERNMENT OF INDIA
MANTA K. SHAH
PUNE DIST
REGD NO 3097
EXPIRY DATE
20/10/2026

# हमीपत्र

(२)

(१९)

हमीपत्र आज दिनांक / /२०२२ इसवी ते दिवशी.

मी/ आम्ही, १) श्री.शिरीष बबन मोरे, वय-४१ वर्षे, धंदा- नोकरी, २) सौ. अर्चना शिरीष मोरे, वय-३७ वर्षे, धंदा- नोकरी, राहणार - ६०२, मॅरीगोल्ड, खराडी , पुणे - ४११ ०१४. हमीपत्र लिहून देतो की,

मौजे रावडे, ता. मुळशी, जि.पुणे येथील गट नं. ४०६/१बी, प्लॉट ८८, ८९ पुणे यांसी एकूण क्षेत्र २७८.५६ चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/ बिगर निवासी पद्धतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत** कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला/आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करुन देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करित आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरीष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत** पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत** मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी / आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रीचे बुकींग करतांना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करुन घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना करुन दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकींगनंतर होणाऱ्या नियोजीत गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत** चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत फ्लॅट धारकाच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करुन देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील. **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत** ला तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी/आम्ही काळजी

(17)

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यांत येईल याची काळजी घेईन/घेऊ

७) हे हमीपत्र माझे/आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी / आम्ही राजीखुषीने दि. ११/०८/२०२२ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांक : ११/०८/२०२२



हमीपत्र लिहून देणार

१) श्री.शिरीष बबन मोरे



) सौ. अर्चना शिरीष मोरे

NOTARY ★ GOVERNMENT OF INDIA ★ MAMTA K. SHAH PUNE DIST. REGD. NO. 9057 EXPIRY DATE 20/10/2026

NOTED AND REGISTERED
AT SR. NO. 13717/2022
DATE 12 AUG 2022

BEFORE ME
MAMTA K. SHAH
NOTARY
GOVT. OF INDIA
PUNE DISTRICT

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL